नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३६ Issue - 36 | वार - मंगळवार दि. ३० जून २०२६ Blow- Tuesday Date 30 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नसरापूर अत्याचारप्रकरणी आरोपीस मरेपर्यंत फाशीची शिक्षा

## नराधमाला मृत्युदंड झाल्याचे पाहून कुटुंबाला अश्रू अनावर; चिमुरडीला न्याय मिळाल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी दोषी ठरलेल्या भीमराव कांबळे याला पुण्यातील विशेष न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. आपल्या लेकीवर अनन्वित अत्याचार करणाऱ्या नराधमाला मृत्युदंड झाल्याचे पाहून कुटुंबाला अश्रू अनावर झाले. तर शिक्षा ठोठावल्यानंतर विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंके यांनी 'आता फासावर चढा' असे शब्द भीमरावला उद्देशून काढले. चिमुरडीला न्याय मिळाल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त केली जात आहे.

भोर तालुक्यातील चिमुरडीवर अत्याचार करुन हत्या झाल्याच्या प्रकरणात निकाल वाचन करताना न्यायमूर्ती म्हणाले की, आरोपीचा पूर्वेतिहास अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. स्वतःची वासना शमवण्यासाठी त्याने हे कृत्य केल्याचं सिद्ध झालं आहे. आरोपीचे वय ६५ वर्षे आहे, पण त्याला दया दाखवता येऊ शकत नाही. कारण या वयातही त्याच्यातील वासना कायम आहे. या गुन्ह्यात मृत्युदंड देण्यामागे अनेक कारणे आहेत. आरोपीचे कृत्य अनकॉमन आहे. ही घटना घडली त्यावेळी पीडित चिमुरडी असहाय्य होती. मात्र गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने आरोपीला कसलीही भीती नव्हती असंही न्यायमूर्ती पुढे म्हणाले.

पीडिता अवघी तीन वर्षांची होती. हत्येनंतरही भीमरावने तिच्यावर अत्याचार सुरु ठेवले. लैंगिक अत्याचार झाल्याचं शवविच्छेदन अहवालातही सिद्ध झालं आहे. चिमुरडी जिवंत राहील, असा पर्यायच आरोपीने ठेवला नाही. आरोपीला आजन्म कारावासच काय, तर फाशीची शिक्षाही अपुरी पडेल. आरोपीने सुधारण्याची पातळी सोडलेली आहे. याआधी ५३ व्या वर्षी कुटुंबातील मुलीवर अत्याचार केला होता, तर वृद्ध महिलेवरही हल्ला. हे दुर्मिळात दुर्मीळ प्रकरण आहे. असं न्यायमूर्तींनी नमूद केलं



ही शिक्षा एका गुन्ह्यातील आरोपीला नाही तर विकृत मानसिकतेच्या लोकांसाठी आहे. अनेक मुली आजही न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी झिरो टॉलरन्स पॉलिसी केली. जास्त फॉरेन्सिक वॅन सध्या फिरत आहेत. पुरावे योग्य आणि महत्त्वपूर्ण ठरत आहेत. न्याय हा ठळक दिसला पाहिजे, तो आज दिसला. यामुळे कायद्याचा जरब बसेल. केस फास्ट ट्रॅकमध्ये चालवणार म्हणजे काय, ते नसरापूर प्रकरणात दिसले. लांडग्यांच्या नांग्या ठेवायचे काम या प्रकरणी दिसले. लोकांना लक्षात आले पाहिजे. प्रलंबित केसमध्ये पण दिसले पाहिजे अशी प्रतिक्रिया भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी व्यक्त केली.

भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर पीडितेच्या आई-वडिलांनी भावनिक प्रतिक्रिया दिली. न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करताना त्यांनी, हा निकाल योग्य आहे, पण त्या नराधमाला प्रत्यक्ष फाशी दिली जाईल, तेव्हाच आमच्या मुलीला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असे आम्ही समजू, असे सांगितले.

गेल्या दोन महिन्यांपासून न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्या कुटुंबासाठी हा दिवस अत्यंत भावनिक ठरला. न्यायालयात निकालाचे वाचन सुरू असताना पीडितेच्या आईला अश्रू अनावर झाले. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावल्याने दिलासा मिळाला असला, तरी अंतिम समाधान आरोपीला प्रत्यक्ष फाशीची शिक्षा झाल्यानंतरच मिळेल. त्यांनी पुढे विश्वास व्यक्त केला की, आरोपीने उच्च न्यायालयात किंवा इतर न्यायालयात अपील केले तरी त्याची शिक्षाच कायम राहील. आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे, असेही त्यांनी नमूद केले.

पीडितेच्या वडिलांनीही न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. या निकालामुळे समाजात स्पष्ट संदेश जाईल की, अशा अमानुष गुन्ह्यांना कायदा कधीही माफ करत नाही. कठोर शिक्षा मिळतेच, असे ते म्हणाले. तपासापासून न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत पोलिसांनी आणि सरकारी वकिलांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली.

# अवकाळी पावसामुळे बाधित ७ लाख शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी मंजूर : मंत्री मकरंद जाधव-पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यात अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने ७ लाख ९ हजार शेतकऱ्यांसाठी ७१७ कोटी रुपयांची मदत मंजूर केली असून, ही रक्कम डीबीटी पद्धतीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य सतेज पाटील, सदाभाऊ खोत, शिवाजीराव गर्जे, प्रज्ञा सातव, विवेक कोल्हे, अंबादास दानवे यांनी उपप्रश्न उपस्थित केला. मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले, ज्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी उपलब्ध आहेत, त्यांच्या खात्यात मदतीची रक्कम थेट जमा केली जात आहे. उर्वरित शेतकऱ्यांची ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या खात्यातही मदत जमा केली जाईल. काही शेतकरी किंवा पशुपालकांना अद्याप मदत मिळाली नसल्यास संबंधित तक्रारी शासनाकडे सादर कराव्यात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने सूचना देऊन पात्र लाभार्थ्यांना मदत मिळवून दिली जाईल. खरीप हंगामात पीक व शेतीच्या नुकसानीसाठी १ कोटी ५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ८ हजार २३६ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. तसेच रब्बी हंगामासाठी जाहीर करण्यात आलेल्या मदतीचे वितरणही सुरू असून, ई-केवायसी किंवा बँक खात्यांतील तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असलेली रक्कम लवकरच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, असे मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी स्पष्ट केले.

# विधानसभेत ‘टीईटी’च्या मुद्द्यावरून विरोधकांचा सभात्याग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नीट, टीईटी यांसारख्या महत्त्वाच्या परीक्षांमध्ये वारंवार पेपरफुटीच्या घटना घडत असल्याने राज्याची देशभर बदनामी होत असून, लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, असा आरोप विरोधकांनी सोमवारी विधानसभेचे कामकाज सुरू होताच केला. यावेळी स्थगन प्रस्ताव मांडू न दिल्याने विरोधकांनी सभागृहात गोंधळ घालत सभात्याग केला. दरम्यान, या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी 'एसआयटी'ची घोषणा केली असून, टीईटी पेपरफुटीप्रकरणी लवकरच सविस्तर निवेदन सादर करणार असल्याने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आश्वस्त केले. (ढएढ एरा झरशिी डशरज्ञ) विधानसभेचे आजचे कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी स्थगन मांडण्याची विनंती केली. काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, लाखो विद्यार्थी आणि शिक्षक वर्षानुवर्षे मेहनत घेऊन परीक्षेची तयारी करतात. मात्र, पेपरफुटीच्या घटनांमुळे त्यांच्या कष्टांवर पाणी फिरत आहे. परीक्षा पारदर्शक पद्धतीने घेण्यात सरकार वारंवार अपयशी का ठरत आहे, याचे उत्तर सरकारने महाराष्ट्राला द्यावे. टीईटी पेपरफुटीप्रकरणातील धागेदोरे, पेपर तयार करणाऱ्या संस्था, संबंधित कंपन्या आणि या प्रकरणामागील संपूर्ण साखळीची सखोल चौकशी करावी. तीन आरोपींना अटक झाली असली, तरी त्यांचे दुसऱ्या राज्यांशी असलेले संबंधही समोर येत आहेत. त्यामुळे या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश होणे आवश्यक आहे. २०१८ मधील टीईटीघोटाळ्यातील आरोपी अभिषेक सावरीकर याचा उल्लेख करत वडेट्टीवार म्हणाले की, घोटाळ्यात आरोपी असलेल्या व्यक्तींना नंतर भाजपमध्ये सन्मानाने प्रवेश मिळाला. क्रिस्टलचे नाव कुठून येत आहे? सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, हे सरकारपुरस्कृत घोटाळे आहेत का, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. राज्यातील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून या गंभीर विषयावर विधिमंडळात सविस्तर चर्चा व्हावी. सरकारने दोषींवर कठोर कारवाई करण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणती ठोस पावले उचलणार आहे,




## विधानपरिषदेत शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे महत्त्वपूर्ण निवेदन

# टीईटी पेपरफुटीप्रकरणी दोषींवर ‘मकोका’ लावणार; पुढील वर्षापासून परीक्षा ऑनलाईन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६ च्या पेपरफुटीचा प्रयत्न उघडकीस येताच, महायुती सरकारने तातडीने आणि अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. या गैरप्रकारात सामील असलेल्या दोषींवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मकोका) कारवाई करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर बदलांची चाचपणी केली जाईल, अशी ग्वाही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली.

याशिवाय, भविष्यात अशा घटनांना पूर्णपणे आळा घालण्यासाठी पुढील वर्षापासून टीईटीसह सर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात येत असल्याची घोषणाही त्यांनी केली.

विधानपरिषदेत सदस्यांनी या संवेदनशील विषयावर प्रश्न उपस्थित करत दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर, विद्यार्थ्यांच्या हितासाठी सरकार आधीपासूनच किती सतर्क आहे, हे स्पष्ट करत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सविस्तर निवेदन सादर केले. त्यांनी सभागृहाला आश्वस्त केले की, सरकार अशा प्रवृत्तींना अजिबात पाठीशी घालणार नाही.

गृहविभाग आणि पोलिसांची तत्पर कारवाई

२८ जून २०२६ रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी उपलब्ध असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना २७ जून रोजीच मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी कोणतीही दिरंगाई न करता सापळा रचला आणि तिघांना रंगेहात ताब्यात घेतले. त्यांच्याकडून जप्त केलेली प्रश्नपत्रिका ही नियोजित परीक्षेचीच असल्याची खातरजमा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली. सरकारने त्वरित पावले उचलल्यामुळेच हा मोठा गैरप्रकार वेळीच उघडकीस आला.

या प्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींवर भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच स्पर्धा परीक्षा आणि परीक्षांमधील गैरप्रकार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अत्यंत कडक कारवाई करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून, त्यांच्याकडून कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सरकारने तात्काळ पोलीस महासंचालकांच्या (उ्रझ) आदेशानुसार या प्रकरणाचा तपास ठाणे शहर पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडे (डखढ) सोपवला आहे. या रॅकेटची पाळेमुळे खणून काढण्यासाठी बिहार, हरियाणा आणि दिल्ली येथे स्वतंत्र पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

सरकारच्या पुढील उपाययोजनाही जाहीर

टीईटीची फेरपरीक्षा पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात घेतली जाईल.

फेरपरीक्षेसाठी उमेदवारांकडून कोणतेही परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

पुढील वर्षापासून टीईटी आणि इतर परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचा आराखडा तयार केला जाईल.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पावसाचा अलर्ट

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या मान्सूनने राज्यात पुन्हा जोरदार पुनरागमन केले आहे. मुंबईसह राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली. रविवारी मध्यरात्रीनंतर मुसळधार पावसाने हजेरी लावली. भारतीय हवामान विभागाने राज्यातील २२ जिल्ह्यांसाठी पावसाचा इशारा जारी केला असून, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, तर २० जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. देशभरात पावसासाठी पोषक अशा अनेक हवामान प्रणाली सक्रिय झाल्या आहेत. हंगामी कमी दाबाचा पट्टा पुन्हा प्रभावी झाला असून, पुढील काही दिवसांत नैऋत्य मान्सून गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या आणखी काही भागांत पुढे सरकण्याची शक्यता आहे. यामुळे महाराष्ट्रासह पश्चिम भारतात पावसाचा जोर आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. रविवार २८ जून ते ४ जुलैदरम्यान कोकण-गोवा परिसरात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातही अनेक भागांत पाऊस होईल, तर काही ठिकाणी मुसळधार सरी कोसळण्याचा अंदाज आहे. विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर सांगोला तालुक्यात दमदार पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कमलापूर परिसरात आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी भर पावसात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्याशी संवाद साधला. पावसामुळे खरीप हंगामातील कामांना वेग येणार असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यात वीज कोसळून एका शेतकऱ्याची बैलजोडी दगावली. आर्थिक अडचणींमुळे नवीन बैलजोडी घेणे शक्य नसल्याने तानबा मरघडे या शेतकऱ्याने मित्राकडून आणलेल्या एका बैलासोबत स्वतः खांद्यावर आऊत घेऊन चार एकर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी केली. या घटनेने शेतकऱ्यांच्या संघर्षाचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

# आधाराच्या शोधात हरवणारी तरुणाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तरुणपण हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो.आजची तरुणाई अभूतपूर्व संधी आणि आव्हानांच्या काळात जगत आहे. शिक्षण, करिअर, स्पर्धा, सामाजिक अपेक्षा आणि बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांच्या मानसिकतेवर मोठा ताण निर्माण होत आहे.या वयात व्यक्ती अनेक स्वप्ने पाहत असतो,नवीन नातेसंबंध निर्माण करत असतो आणि स्वतःची ओळख घडवत असतो. मात्र याच काळात मानसिक ताण, अपयश, एकटेपणा आणि असुरक्षिततेच्या भावना देखील अनुभवाव्या लागतात. अशा परिस्थितीत अनेक तरुण भावनिक आधार शोधतात. आधाराची गरज नैसर्गिक असली तरी योग्य मार्गदर्शनाऐवजी चुकीच्या व्यक्ती, नातेसंबंध किंवा आभासी जगावर अवलंबून राहिल्यास किंवा त्याचा अतिरेक झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

कुटुंब हे व्यक्तीच्या भावनिक विकासाचे पहिले केंद्र असते. परंतु आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव जाणवतो. पालक आणि मुलांमध्ये मोकळेपणाने विचारांची देवाणघेवाण होत नाही. तरुणांच्या भावना, समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. परिणामी, अनेक तरुण आपल्या मनातील गोष्टी कुटुंबाऐवजी बाहेरील व्यक्तींशी शेअर करण्यास प्राधान्य देतात.

कौटुंबिक पारदर्शकतेचा अभाव ही देखील एक गंभीर समस्या आहे. घरातील निर्णय, नातेसंबंध किंवा आर्थिक परिस्थिती याबाबत स्पष्टता नसल्याने तरुणांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्याचबरोबर वाढते मतभेद, विरोधकांची संख्या आणि सतत होणारी टीका यामुळे आत्मविश्वास कमी होतो. अशा परिस्थितीत सहानुभूती दाखवणारी कोणतीही व्यक्ती त्यांना जवळची वाटू लागते.

भावनिक आधार घेताना अनेक तरुण विवेक गमावतात. समोरची व्यक्ती आपली काळजी घेते, आपल्याला समजून घेते या भावनेतून ते तिच्यावर पूर्ण विश्वास ठेवतात. काही वेळा अशा विश्वासाचा गैरफायदा घेतला जातो. भावनिक शोषण, फसवणूक, आर्थिक नुकसान किंवा मानसिक छळ यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

काही तरुण एखाद्या व्यक्तीवर इतके अवलंबून होतात की स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. त्या व्यक्तीशिवाय जगणे अशक्य वाटू लागते. जेव्हा नातेसंबंध तुटतात किंवा अपेक्षा पूर्ण होत नाहीत, तेव्हा नैराश्य, चिंता, आत्मविश्वासाचा अभाव आणि काही वेळा आत्मघातकी विचारदेखील निर्माण होऊ शकतात.

सोशल मीडियाने ही समस्या आणखी गुंतागुंतीची केली आहे. अनेकदा आभासी जगातील नातेसंबंध वास्तवापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटू लागतात. लाईक्स, कमेंट्स आणि फॉलोअर्स यांच्या माध्यमातून मिळणारा तात्पुरता भावनिक आधार अनेकांना आकर्षित करतो. मात्र ही नाती नेहमीच विश्वासापात्र असतील असे नाही. त्यामुळे फसवणूक आणि भावनिक दुखापत होण्याची शक्यता वाढते.

भावनिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रत्येक तरुणाने स्वतःवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. समस्या आल्यास त्यांचा सामना करण्याची तयारी, सकारात्मक विचारसरणी, कुटुंबाशी मोकळा संवाद आणि योग्य मार्गदर्शन यामुळे भावनिक स्थैर्य प्राप्त होते. आधाराची गरज असली तरी स्वतःची ओळख आणि स्वाभिमान जपणे अधिक महत्त्वाचे आहे.

प्रत्येक तरुणाने आत्मविश्वास, स्वावलंबन आणि भावनिक परिपक्वता विकसित करणे आवश्यक आहे. कुटुंबातील संवाद वाढवणे, विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे.भावनिक आधाराचा शोध घेताना विवेक,आत्मभान आणि योग्य मार्गदर्शन यांचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे.भावनांवर नियंत्रण आणि स्वतःवरील विश्वास हेच यशस्वी व संतुलित जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत.

**– कु.उर्वशी मनिष संघवी**
**(रा.मुर्तिजापूर, जि.अकोला)**





# धोकादायक संरक्षक भिंत तात्काळ दुरुस्त करा; अन्यथा दुर्घटनेची जबाबदारी प्रशासनाची

## प्रशांत करंजे यांचे आयुक्तांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : घाटकोपर पश्चिम येथील गणेश नगर (ब) परिसरातील सिंह गर्जना सेवा मंडळ,साईनाथ गृहनिर्माण सोसायटी याठिकाणी जीर्ण व धोकादायक झालेल्या संरक्षक भिंत(रिटेनिंग वॉल) तात्काळ दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीची मागणी करत महाराष्ट्र सैनिक प्रशांत करंजे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन सादर केले आहे.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही धोकादायक परिस्थितीत असलेली संरक्षक भिंत कोसळण्याचा धोका अधिक वाढल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.निवेदनात म्हटले आहे की,वॉर्ड क्रमांक १२३ मधील येथील रस्ता व संरक्षक भिंत मोठ्या प्रमाणात खचली असून त्याठिकाणी मोठमोठे तडे गेले आहेत.या धोकादायक संरक्षक भिंतीच्या खालील बाजूस अनेक कुटुंबे वास्तव्यास असून, तसेच संरक्षक भिंतीवर विद्युत खांबही उभा आहे.त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.मुसळधार पावसामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली असून नागरिकांना जीव मुठीत धरून राहावे लागत आहे.यापूर्वी या गंभीर प्रश्नाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदन देण्यात आले असून,वारंवार माहिती देण्यात आल्याचे प्रशांत करंजे यांचे म्हणणे आहे.मात्र,अद्याप यावर कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशांत करंजे यांनी महापालिका प्रशासनाकडे संबंधित ठिकाणाची तात्काळ पाहणी करून धोकादायक संरक्षक भिंत दुरुस्त किंवा पुनर्बांधणीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याची मागणी केली आहे.तसेच भविष्यात या संरक्षक भिंतीमुळे जीवित अथवा वित्तहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मनपा विभाग,जबाबदार अधिकारी आणि दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाची राहील,असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या संदर्भात सिंह गर्जना सेवा मंडळ साईनाथ गृहनिर्माण सोसायटीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र सैनिक प्रशांत धर्मा करंजे यांनी महापालिका प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी,अशी मागणी केली आहे.नागरिकांच्या जीवाशी खेळ होण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन तातडीने यावर उपाययोजना करावी,अशी भावना परिसरातील रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

# सिंदखेड राजा शहर पल्स पोलिओ लसीकरण मोहीम; मोबाईल टीम पोहोचली थेट शेतकऱ्यांच्या बांधावर






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा : सिंदखेड राजा शहरात आज दि,२८/०६/२०२६ रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिम अंतर्गत आरोग्य विभागाच्या मोबाईल टीमने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन लहान बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस दिली.

दुर्गम भागातील तसेच शेतात काम करणाऱ्या कुटुंबांपर्यंत पोहोचून एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. मोबाईल टीमने पालकांशी संवाद साधून पोलिओ लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगितले.

या मोहिमेत कर्मचारी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा शहर येथील एकूण लाभार्थी १९२२ पैकी १६५१आज लाभार्थी झालेले आहेत एकूण काम ८५.९०% झालेले आहे उरलेले काम मंगळवार पासून खझझख घरोघरी जाऊन बालकांचे लसीकरण होणार आहे यासाठी डॉ विलास दराडे सर, डॉ. गाणार सर, डॉ. मेहेत्रे, डॉ. पवार, डॉ प्रवीण सोनूने सर, श्री संतोषकुमार देशमुख, (बापू ) श्री राठोड सर, श्री खरात सर, श्री.सुरवसे सर, श्री गायकवाड सर, श्री.चदणकर सर, श्री रोडगे सर, श्री महाडिक सर, चौथे सिस्टर, मान्टे सिस्टर, जाधव सिस्टर, गायकवाड यांनी परिश्रम घेतले तथा ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा शहर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या सहकार्यामुळे लसीकरण मोहीम यशस्वीपणे पार पडली.

आरोग्य विभागाने सर्व पालकांना आवाहन केले आहे की, ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओची लस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवन्याचे आव्हान केले.

# निफाडला राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमअंतर्गत निफाड उपजिल्हा रुग्णालय येथे लहान बालकांना पोलिओ डोस चा शुभारंभ रुग्ण कल्याण समितीचे सदस्य मधुकरराव शेलार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शेलार यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचे महत्व सांगून जनजागृतीपर विविध मुद्द्यांची उपस्थितांना माहिती दिली. यावेळी सदस्य मधुकरराव शेलार, डॉ.सतीश पोटे, राहुल दवते, मधुसूदन आव्हाड, अशोक पगारे, रमेश सानप, मुख्य परिचारिका श्रीमती संजीवनी फणसे, श्रीमती अनिता शिंदे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक संतोषकुमार भोजने 'क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले समाजरत्न पुरस्काराने' सन्मानित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातूर येथे आयोजित भव्य अशा पारंपरिक कला महोत्सवात तांदुळवाडी ता कळंब येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक श्री. संतोष कुमार भोजने यांना महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन यांच्या मार्फत यंदाचा मानाचा ' क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार २०२६ नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

लातूरचे माजी खासदार प्रा. डॉ. ॲड. सुनीलजी बळीराम गायकवाड साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात मराठवाडा शिक्षक आमदार श्री विक्रम बप्पा काळे यांच्या उपस्थितीत शनिवार दि. २७ जून २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

श्री संतोष भोजने यांना यापूर्वी अपूर्वा अभिमत ज्ञानपीठ मुंबई चा २०१८-१९ चा राज्य स्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार, तसेच राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाचा २०२३-२४ चा, डॉ पंजाबराव देशमुख राज्य स्तरीय ओबीसी रत्न पुरस्कार मिळाले आहेत.

सध्या ते मुख्याध्यापक म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी ता कळंब जि धाराशिव येथे कार्यरत असुन,राज्य समन्वयक, माळी विकास मिशन शिक्षण प्रसार समिती महाराष्ट्र म्हणूनही म्हणूनही काम करत आहेत.तसेच ते प्रदेश सरचिटणीस राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र चेही कार्य करत आहेत.

ओबीसी आरक्षण बचाव चळवळीत त्यांचे सक्रिय योगदान असुन ओबीसी ना आपल्या हक्कासाठी जागृत करण्यासाठी ऑनलाईन शिबिराचे आयोजन,विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनाचा लाभ मिळवून देण्यासाठी अहोरात्र योगदान,बिंदू नामावलीत ओबीसीवर अन्याय होऊ नये म्हणून संघर्ष, शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चळवळीच्या माध्यमातून आवाज उठवला आहे.माळी विकास मिशन च्या माध्यमातून मागील चार वर्षात मेडिकल व इंजिनिअरिंगच्या ६०-६५ विद्यार्थी मुलामुलींना ४० लाखाची समाजाकडून मदत मिळवून दिली.

समाजातील रुग्णांना मदतीचा हात देऊन रुग्ण सेवा केली आहे. शाळेच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी समाज सहभाग घेऊन शाळेला रंग रांगोटी, पिण्याचे पाणी, विज्ञान प्रयोग शाळा, संगणक लॅब, क्रीडा साहित्य,कंपाउंड भिंत, वृक्षारोपण तर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, दप्तरं, ग्रंथालयासाठी पुस्तके इत्यादी उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवून देण्यासाठी शिष्यवृत्ती, मंथन, प्रज्ञाशोध, नवोदय, सैनिकी शाळेत प्रवेश. क्रीडा स्पर्धेत तालुका व जिल्हा स्तरावर यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांना मिळालेल्या सन्मानबद्दल गुरुजन वर्गातून त्यांचे अभिनंदन होत आहे. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघांचे प्रदेश अध्यक्ष श्री अनिल नाचपल्ले, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, कार्याध्यक्ष परमेश्वर साखरे, दिपक हजारे, बालाजी माळी, शांतीनाथ ढोले, राजेंद्र बिक्कड, गौतम जाधवर, सचिन क्षीरसागर, दिलीप डोईफोडे, रामहरी मुंडे, पत्रकर सुधाकर रणदिवे यांनी अभिनंदन केले.तसेच कळंब तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, रामचंद्र तांदळे, माजी खासदार सुनिल गायकवाड साहेब, शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, सिने अभिनेत्री मैथिली वारंग, रमाईकार गायत्री रामटेके, स्वाती पुणेकर, बालकलाकार सिफा पवार, प्रमुख पाहुणे सुरेखा पाटील , बालाप्रसाद सोमानी, ह भ प महाराज अडसूळ कळंबकर, विशेष सहकार्य उषाताई धावारे, सुरेखा घोडके, सहारा शेख, जान्हवी सोनसळे, कल्पना बाबर, छाया कळसे, विनायक काळे, उद्धव जाधव, चंद्रकांत वायाळ, गुलाम शेख, शिद्दीक सय्यद, पत्रकार संतोष सोनवणे, आकाश कांबळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मांदळे सर यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजक व संयोजक नियोजन कमिटीचे प्रमुख व महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन चे संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन हे होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री. विठ्ठल रुक्मिणी मातेच्या तुळशी अर्चना पूजेची ३० जूनपासून ऑनलाईन नोंदणी

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके; १ ते ९ जुलै २०२६ मधील पुजांची होणार नोंदणी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची तुळशी अर्चन पूजा मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत असून दि. ०१ ते ०९ जुलै, २०२६ या कालावधीतील तुळशी अर्चन पुजेची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि. ३० जून रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

या पूजेसाठी रुपये २१००/- इतके देणगी मूल्य आहे. दिनांक ०१ जुलै ते ०९ जुलै या कालावधीतील गर्दीचे व सण-उत्सवाचे दिवस वगळून भाविकांना पूजा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी यावेळी सांगितले.

# वंचितचा अर्ध नग्न आंदोलनाचा इशारा




**विविध मागण्यासाठी शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट शहर व तालुक्याच्या वतीने निवेदन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहरांमध्ये सध्या धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून शहरवासीयांना धुळीमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे, शहरवासीयांच्या आरोग्य धोक्यात आले आहे धुळीमुळे श्वासनाचा रोग दमा साईनान्स अशा अनेक प्रकारची रोग शहरवासीयांना होण्याचे चिन्ह आहे याचे कारण नगरपालिकेच्या वतीने ड्रेनेज च्या नावाखाली संपूर्ण शहरभर खोदकाम करून पाईपलाईन घालण्याचे काम चालू आहे सगळ्या ठिकाणी पाईपलाईन होऊन महिना उलटला तरीही काँक्रिटीकरण करण्यात आलेल नाही.

दिवसेंदिवस श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी महाराष्ट्र व अन्य राज्यातून स्वामीभक्त अक्कलकोटला येत आहेत. अशा मध्ये ड्रेनेज चे काम होऊन तुरंत काँक्रिटीकरण करणे गरजेचे असताना नगरपालिकेच्या वतीने या कामासाठी दुर्लक्षित होत असल्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज निवेदनाद्वारे जर आठ दिवसात संपूर्ण शहरभर काँक्रिटीकरण नाही झाले तर नगरपरिषद अक्कलकोटच्या कार्यालयासमोर अर्ध नग्न आंदोलनाचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला.

त्याचप्रमाणे सगळ्यात भयानक वास्तव पाण्याचा असून शहराला पंधरा ते वीस दिवसाला एकदा पाणी पुरवठा होतो. तो पाणीपुरवठा चार दिवसाला एकदा करा अन्यथा मोठ्या प्रमाणात अर्ध नग्न आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे, तालुका अध्यक्ष विशाल ठोंबरे, युवक शहराध्यक्ष संदीप बाळ शंकर, जिल्हा उपाध्यक्ष द ॅ व ा न ं द अस्वले, ता. उपाध्यक्ष यशवंत शेठ इंगळे, ता. महासचिव नागेश् हरवाळकर व अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# वाखरीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जिल्ह्यातील राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज आयुष्मान आरोग्य उपकेंद्र, वाखरी (ता. पंढरपूर) येथे उत्साहात करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, सभापती, पंचायत समिती शुभम आगवणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सरडे, डॉ. सुडके, प्रा. आ. केंद्र गादेगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आगावणे, सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार हे उपस्थित होते. तसेच परिसरातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, वाखरी गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी श्री. कोळी, आरोग्य कर्मचारी, पालक व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ५ वर्षांखालील बालकाला पोलिओचा डोस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पालकमंत्री महोदय यांनी जिल्ह्यातील आजच्या पल्स पोलिओ मोहिमेस शुभेच्छा देत 'दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय मिळवू दरवेळी' हा संदेश दिला.




जिल्ह्यातील ४,३६,५७२ बालकांसाठी ६,५१३ लसीकरण बूथवर ७,२२२ कर्मचारी कार्यरत आहेत. ० ते ५ वर्षांखालील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. कार्यक्रमास उपस्थित पालकांनी आपल्या बालकांना पोलिओचा डोस पाजून मोहिमेत सहभाग नोंदवला.

# सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या महापौरांकडे विविध मागण्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या शिष्टमंडळाने महापौर श्री.विनायक कोंड्याल यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. क्रीडाभारतीचे प्रदेशमंत्री व नगरसेवक श्री. ज्ञानेश्वर माऊली म्याकल यांच्या पुढाकाराने महापौरांची भेट घडवून आणण्यात आली. संघाचे अध्यक्ष श्री.विजयराव कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात संघाचे सचिव श्री.नागनाथ पाटील,कोषाध्यक्ष बाबूशेठ सोनी,गरड व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री. दशरथ वडतिले यांचा समावेश होता.मागण्यांचे निवेदन स्वीकारल्यानंतर महापौर श्री.कोंड्याल यांनी ज्येष्ठ नागरिक संघास सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.संघाने महापौरांकडे कार्यालयासाठी जागेची व इतर मागण्या केल्या आहेत.नगरसेवक श्री.म्याकल यांनी संघाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सोलापुरातील प्रत्येक प्रभागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सुरू करण्याचा श्री.म्याकल यांचा मानस आहे.

# सोलापूर जिल्हा शिवसेना ओबीसी विभागाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवड पत्रांचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक २९ रोजी पंढरपूर येथे (शिंदे गट) जिल्हा ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या निवडीची पत्र रोजी त्यांना वाटप करण्यात आले.

ावेळी (शिंदे गट) शिवसेना ओबीसी प्रदेशाध्यक्ष श्री. रमेश बारस्कर, उपस्थित सोलापूर जिल्हा ओबीसी जिल्हाध्यक्ष राजकुमार हिवरकर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष श्री लोखंडे, सोलापूर ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप भोसले यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, या तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची पद नियुक्तीचे पत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी ओबीसी प्रदेशाध्यक्ष रमेश बारस्कर यांनी महाराष्ट्र राज्याची माजी मुख्यमंत्री व तथा उपमुख्यमंत्री यांनी लाडक्या बहिणीसाठी एक भेट म्हणून त्यांना ५०% सवलती मध्ये शिलाई मशीन दहा हजार नग वाटप करण्याचे उद्देश त्यांनी पूर्ण करण्यात यशस्वी झाले आहे. तरी लाडक्या बहिणीसाठी व अनेक जनसामान्य जनतेच्या योजना राबवत आहेत आरोग्य ही योजना, साठ वर्षे पूर्ण झालेल्या त्यांच्यासाठी पेन्शन योजना व मोफत आरोग्य आयुष्यमान कार्ड या सर्व योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याची काम सर्व शिवसेना कार्यकर्त्यांनी करावी अशी भावना शिवसेना प्रदेशाध्यक्ष रमेश बारस्कर यांनी संपूर्ण शिवसेना कार्यकर्त्यांना आपल्या शिवसेना गाव तिथे शाखा या पद्धतीने शिवसेनेचा मोठ्या पद्धतीने प्रत्येक गावामध्ये शिवसेनेचा कार्यकर्ता तयार झाला पाहिजे अशा प्रकारची त्यांची भावना त्यांनी पंढरपूर येथे ओबीसी सेलच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीच्या वेळेस त्यांनीही सर्व कार्यकर्त्यांना संबोधित केले आहे.

त्याचबरोबर उद्धव ठाकरे यांच्या विरोधात घोषणा देत त्यांचा निषेधही करण्यात आला, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी श्री श्रीकांत ( दादा) शिंदे यांचेही हात बळकट करण्यासाठी सर्व शिवसेना कार्यकर्त्यांनी आपल्या प्रत्येक तालुक्यामध्ये व गावांमध्ये शिवसैनिक तयार करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या शिवसेना कार्याची व सामान्य जनतेपर्यंत व सर्व तळागाळातील लोकांपर्यंत शिवसेनेची चाललेली ही जनतेपर्यंत प्रत्येकाला आरोग्यविषयक, मोफत व्यवस्था, व साठ वर्षाखालील सर्व लोकांना आयुष्यमान कार्ड पाच लाखापर्यंत आरोग्य व्यवस्था मोफत असणार आहे याची माहिती सर्व जनतेला व तळागाळातील लोकांना सांगून शिवसेना कशा पद्धतीचे काम करत आहे ही सर्व योजना सर्व लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम शिवसेना कार्यकर्त्यांनी करावे असेही आव्हान श्री राजकुमार हिवरकर पाटील यांनी पंढरपूर येथील ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या निवडी व मेळावा यामध्ये त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना संबोधित केले आहे.

## त्तम पथनाट्याची रचना करून मनोरंजनातून जनजागृती

## पथनाट्याचे नागरिकांतून कौतुक

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे मोबाईल आणि सोशल मीडियाच्या जबाबदार वापराबद्दल प्रभावी पथनाट्य





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने पंढरपूर शहर पोलीस विभाग तसेच निर्भया पथक, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे 'मोबाईल व सोशल मीडियाचा योग्य वापर' या विषयावर जनजागृतीपर प्रबोधनात्मक पथनाट्य सादर करण्यात आले. सध्याचे युवक मोबाईलच्या वापराचा अतिरेक करत आहेत. त्यामुळे त्यांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. अभ्यास करण्याच्या वयात विद्यार्थी व तरुण मोबाईलचा अतिवापर करत असल्याचे दिसून येते. अशा विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून समाज प्रबोधन करणे गरजेचे असते. त्यासाठी स्वेरीने एक उत्तम पथनाट्याची रचना करून मनोरंजनातून जनजागृती केल्याचे दिसून येते.

स्वेरी संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'मोबाईल फोन व सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे निर्माण होणाऱ्या विविध सामाजिक समस्या, त्यांचे होणारे दुष्परिणाम तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश पथनाट्याद्वारे प्रभावी पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचविला. या कार्यक्रमात पंढरपूर शहर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या निर्भया पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया रावण यांनी स्वयंसेवकांसमवेत सहभाग नोंदवत या सामाजिक कार्यक्रमास विशेष सहकार्य केले. यावेळी पंढरपूर विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांनी उपस्थित नागरिक व युवकांना मार्गदर्शन केले. सध्याचे मोबाईलचे वाढते व्यसन, सोशल मिडियाचा गैरवापर, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण तसेच त्यांचे वैयक्तिक, शैक्षणिक आणि सामाजिक जीवनावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे उत्तम अभिनय करत वास्तवता मांडली व यातून होणारे दुष्परिणाम दाखवत यापासून कसे दूर राहू शकतो, हेच सुचविलेले आहे. आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांनी स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्याचे कौतुक करत स्वयंसेवकांनी सादर केलेल्या प्रभावी पथनाट्यासाठी संपूर्ण रासेयो मधील स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश: सांगोला आगारास पाच नवीन एसटी बसेस मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सांगोला आगारास पाच नवीन एसटी बसेस मंजूर झाल्या असून त्या पुढील आठवड्यात सांगोल्यात दाखल होत आहेत.

सांगोला आगार हा सोलापूर-सांगली महामार्गावरील महत्त्वाचा आगार आहे. येथून दररोज अनेक गावांमध्ये, तालुक्यांमध्ये आणि जिल्ह्यांमध्ये प्रवासी वाहतूक सुरू असते. मात्र, बसांची संख्या अपुरी पडल्याने प्रवाशांना अनेकदा गैरसोय सहन करावी लागत होती. विशेषत: शेतकरी, विद्यार्थी, महिल आणि रोजंदारी कामगारांसाठी ही समस्या अधिक जाणवत होती. या पार्श्वभूमीवर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी परिवहन मंत्री मा.ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. श्रृया पाठपुराव्यास यश मिळाले असून पुढील आठवड्यात पाच बसेस सांगोल्यात दाखल होणार आहेत.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघातील मूलभूत सुविधांवर भर दिला आहे. बससेवेच्या विस्तारासाठी त्यांनी परिवहन मंत्री मा.ना. प्रताप सरनाईक आणि संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. सांगोला तालुक्यातील गावागावातील प्रवाशांना चांगली सेवा मिळावी, यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन, असे आमदार देशमुख यांनी यावेळी सांगितले.

नवीन बसेस मंजूर करून घेतल्याबद्दल आगारप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे आभार मानले. या बसेसमुळे सांगोला ते सोलापूर, कोल्हापूर, पुणे आणि इतर ठिकाणांच्या बससेवा अधिक सुधारणार आहेत. यामुळे प्रवासी क्षमता वाढेल आणि वेळापत्रक अधिक नियमित होईल.

सांगोला तालुक्यातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून आता सकाळी आणि संध्याकाळी अधिक बसेस उपलब्ध होतील. विद्यार्थ्यांना आणि बाजाराला जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.या नवीन बसेस आधुनिक सुविधायुक्त असल्याचे सांगण्यात आले आहे. यावेळी बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले की, येत्या काळात आणखी बसेस आणि नवीन मार्गांसाठी प्रयत्न सुरू आहेत. जनतेला चांगली सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी सतत प्रयत्न चालूच राहतील.

सदरच्या नविन बसेस सांगोला आगारास मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री मा.ना.प्रताप सरनाईक यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

## मौजे गोगांव येथे मुसळधार पाऊस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : मौजे गोगांव सह परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस गेल्या दोन दिवसापासून सुरुवात झाले असून काल मुसळदार पावसामुळे रस्त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

गेल्या महिनाभरापासून पाऊस नसल्याने शेतकरी चिंतेत होते काही शेतकरी पेरणी केले होते परंतु पाऊस नसल्याने शेतकरी खत बी बियाणे पेरणीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केले होते या पाऊसमुळे काही प्रमाणात शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद फुलले आहे.

मौजे गोगांव येथे मुसळधार पाऊस पडल्याने जिल्हा परिषद शाळे जावळ फुलावर मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने काही काळ वाहतूक व शेतकऱ्यांनी जाण्यासाठी रस्ता बंद झाले होते या पाऊसमुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले व पडसावळ रस्ता मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे फुलावरून पाणी गेल्याने मोठ मोठे खड्डे पडले आहेत.

## वटपौर्णिमे दिवशीच विजेचा धक्का बसून आंबे येथील शेतकरी पती-पत्नी ठार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुका पंढरपूर, चळे येथील शेतामधील विजेची मोटर बंद करण्यासाठी गेल्यावर विजेचा शॉक लागल्याने शेतकरी पती-पत्नी, ठार झाले ही घटना पंढरपूर तालुक्यातील आंबे या गावातील सोमवारी सकाळी घडली आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आंबे येथील शेतकरी लक्ष्मण नागणे (वय ६० वर्ष) हे शेतातील मोटर सुरू करण्यासाठी गेले होते, मात्र काल पाऊस पडला असल्यामुळे मोटारीमध्ये विद्युत प्रवाह वाहत होता. लक्ष्मण नाणी यांना याची माहिती नसल्याने ते नेहमीप्रमाणे मोटर सुरू करण्यासाठी गेले. त्यावेळी त्यांना विजेचा धक्का बसून ते विजेच्या वायरला चिटकले हे पाहून त्यांची पत्नी अलका मागणी (वय ५५ वर्ष) त्यांनी पतीला मदत करण्यासाठी गेले असता त्यांनाही विजेचा धक्का बसला व दोघे पती-पत्नी जाग्यावर ठार झाले.

काही वेळानंतर परिसरात शेतकऱ्यांना याची माहिती मिळाली व त्यांनी तात्काळ वीज पुरवठा बंद करून दोघं पती-पत्नीच्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

वटपौर्णिमेदिवशी सकाळी ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे परिसरात हा व्यक्त होत असून मागणी कुटुंबीयांना शासकीय मदत मिळावी अशी मागणी होत आहे.

## वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूरकडे पायी मार्गस्थ होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे 'चरण सेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध आरोग्य संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांच्या चरणसेवेला प्रारंभ झाला आहे. त्यात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि आरोग्य जनजागृतीच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**चरण सेवेकरिता समन्वय**

वारकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'चरण सेवा' उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ प्रमुख जिल्ह्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावरील सुमारे ४०० विश्रांती व मुक्काम स्थळी वारकऱ्यांसाठी चरण सेवा, वैद्यकीय तपासणी, प्राथमिक उपचार तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या समन्वयातून १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय व फिजिओथेरपीचे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होऊन वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत असतील.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाद्वारे मालिश**

आषाढी वारीदरम्यान दररोज अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायांवर मोठा ताण येतो. पायांना सूज, वेदना, फोड, स्नायूंचा ताण व थकवा यांसारख्या समस्यांवर तात्काळ उपाययोजना उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पालखी मार्गावरील मुक्कामाच्या ठिकाणी प्रशिक्षित वैद्यकीय पथके व स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत.

या उपक्रमांतर्गत औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयांकडे संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी सुमारे ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार पालखी मार्गावर रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.

**८ आरोग्य रथाद्वारे जनजागृती**

चरण सेवेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैलीचा संदेश तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून पालखी मार्गावरील वारकरी आणि नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी पालखी मार्गावरील निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

गतवर्षी राबविण्यात आलेल्या 'चरण सेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. या उपक्रमाद्वारे सुमारे १ लाख ७५ हजार वारकऱ्यांना थेट चरण सेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला होता. यंदाही अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत चरण सेवा, वैद्यकीय सुविधा आणि आरोग्य जनजागृती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

> **मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम**

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची'

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरण सेवा' हा उपक्रम वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देणारा अभिनव उपक्रम आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकारातून जिल्हा प्रशासन, शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालये, विविध संस्था, सेवाभावी संघटना तसेच स्वयंसेवक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे वारकऱ्यांचा पायी प्रवास अधिक सुरक्षित, सुदृढ आणि सुखकर होण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख तसेच पालखी मार्गावरील नागरिकांना 'चरणसेवा' आणि आरोग्य जनजागृती उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

चरणसेवा म्हणजे काय?

संत तुकाराम महाराजांनी तुज मागणें तें देवा, आम्हां तुझी चरण सेवा या अभंगातून चरण सेवेचे महत्व अधोरेखित केले आहे. त्याच सेवाभावातून प्रेरणा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'चरण सेवा' उपक्रम गेल्या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे.

आषाढी वारीत अनेक किलोमीटर पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या पायावर मोठा ताण येत असल्याने त्यांना औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायाची मालिश, फिजिओथेरपी, आधुनिक मसाज उपकरणांच्या साहाय्याने स्नायूंना आराम, सूज, वेदना व फोडांवर प्राथमिक उपचार तसेच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देत सेवाभावातून आधार देणारी हीच 'चरणसेवा' होय. संत तुकाराम महाराजांच्या सेवाभावाच्या विचारांना आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देत वारकरी परंपरा आणि लोकसेवेचा सुंदर संगम या उपक्रमातून घडविण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून आणि सेवाभावी दृष्टिकोनातून 'चरण सेवा' उपक्रम साकार झाला आहे. वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सुविधांची जोड देणारा हा एक अभिनव उपक्रम असून, आषाढी वारीत लाखो वारकऱ्यांच्या थकलेल्या पायांना दिलासा देतानाच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न या माध्यमातून होत आहे. वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष विविध संस्थांच्या समन्वयातून यंदाही ही चरण सेवा अधिक व्यापक स्वरूपात वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यास सज्ज असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.


### 'मन की बात' कार्यक्रमामधून देशातील जनतेला केले संबोधित
### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

## समुद्रापासून आकाशापर्यंत; भारत वेगाने सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनतोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज म्हणजेच रविवार २८ जून २०२६ रोजी १३५ व्या 'मन की बात' कार्यक्रमामधून देशातील जनतेला संबोधित केलं. या निमित्तानं नरेंद्र मोदींनी विविध विषयांवर भाष्य केले. नरेंद्र मोदी म्हणाले, ''२०२६ हे वर्ष संपणार आहे. या सहा महिन्यांत आपण 'मन की बात'मध्ये आपल्या देशवासियांच्या अनेक कामगिरींवर चर्चा केली आहे. जून महिन्यातही देशानं अशी काही यशोगाथा रचली आहे, ज्यामुळं प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटतो. हे यश राष्ट्राच्या सुरक्षेशी आणि आत्मनिर्भरतेशी जोडलेले आहे.''

''अलीकडेच मला कोलकाता इथं नौदलाशी संबंधित एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली, जिथं आयएनएस दूनागिरी, आयएनएस संशोधक आणि आयएनएस अग्रय यांचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात समावेश करण्यात आला. या जहाजांच्या रचनेपासून ते बांधकामापर्यंत सर्व काही स्वदेशी आहे,'' असं नरेंद्र मोदींनी सांगितलं. पुढं ते म्हणाले, ''देशानं जून महिन्यातच हवाई वाहतूक क्षेत्रात मोठं यश मिळवलं आहे. 'मेड इन इंडिया' असलेल्या सी-२९५ विमानानं आपले पहिलं उड्डाण यशस्वी केलं असून,



अशी ४० विमानं भारतातच तयार केली जात आहेत. यामुळं एमएसएमई आणि एरोस्पेस क्षेत्रांना नवी चालना मिळत आहे, रोजगाराच्या संधी वाढत आहेत आणि आत्मनिर्भर भारताचा निर्धार अधिक दृढ होत आहे.''

याचबरोबर, ''या महिन्यात डीआरडीओनं एका स्वदेशी लांब पल्ल्याच्या भू-लक्ष्यी क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणीही घेतली. हे क्षेपणास्त्र डीआरडीओच्या प्रयोगशाळा आणि भारतीय उद्योग भागीदारांनी संयुक्तपणे विकसित केले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झाल्यास, समुद्रापासून आकाशापर्यंत, आपला भारत वेगानं सुरक्षित आणि आत्मनिर्भर बनत आहे,'' असे नरेंद्र मोदींनी सांगितले. पुढे नरेंद्र मोदी म्हणाले, ''जून महिन्यात आणखी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं, ज्यामध्ये संपूर्ण जग भारताच्या प्रयत्नांमध्ये सामील झाले होते. हा कार्यक्रम होता 'आंतरराष्ट्रीय योग दिवस'. यावेळी जगभरात २५०० हून अधिक ठिकाणी योग कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. आपल्या देशातल्या कोट्यवधी लोकांनी विविध ठिकाणी आयोजित केलेल्या योगविद्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. या महिन्यात अहमदाबाद इथं झालेल्या 'जागतिक योगासन स्पर्धे'चीही खूप चर्चा झाली. या स्पर्धेत भारताने १०२ सुवर्ण पदकांसह एकूण ११४ पदके जिंकली. या स्पर्धेत भारतानं पदक तालिकेत अव्वल स्थान पटकावलं. मी सर्व विजयी खेळाडूंचं मन:पूर्वक अभिनंदन करतो.''

''पश्चिम आशियातली युद्धाची परिस्थिती पाहता, मी देशवासियांना काही विनंत्या केल्या होत्या. मी म्हटलं होतं की, शक्यतोवर काही काळ सोनं खरेदी करणं टाळावं. मी लोकांना परदेशात सुट्ट्या घालवणंही टाळण्यास सांगितलं होतं. मी शेतकऱ्यांना रासायनिक खतमुक्त शेती करण्याचं, शेतजमिनी वाचवण्याचं आणि शक्य तितकं नैसर्गिक खत वापरण्याचं आवाहन केलं होतं. मी देशाच्या प्रत्येक नागरिकाचा आभारी आहे की, त्यांनी माझ्या आवाहनाला केवळ पाठिंबाच दिला नाही, तर ते सर्व बाजूंनी सहकार्यही करत आहेत. अनेक कुटुंबांनी मला संदेश पाठवून त्यांचे अनुभव सांगितले आहेत. अनेक कुटुंबांनी ठरवले आहे की, ते यावेळी कुटुंबातल्या लग्नांसाठी सोनं खरेदी करणार नाहीत. गरज पडल्यास ते जुन्या सोन्याचा पुनर्वापर करून नवीन दागिने बनवतील. अनेक लोकांनी समाज माध्यमांवर असेही लिहिले आहे की, त्यांनी यावेळी आपले परदेश दौरे कसे पुढे ढकलले आहेत,'' असे नरेंद्र मोदी म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्रातील नांदेडमधील एका कुटुंबाने लग्नात गावातील लोकांचा विमा उतरवल्याचा उल्लेख आज नरेंद्र मोदी यांनी आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमात केला. ते म्हणाले, ''आपल्या देशात वाढदिवस आणि लग्नसोहळे हे केवळ कौटुंबिक कार्यक्रम न राहता संपूर्ण समाजाचे उत्सव बनलेले असतात. प्रत्येक कुटुंबाला आपला आनंद इतरांसोबत वाटून घ्यायचा असतो. लोक पाहुण्यांना भेटवस्तूही देतात. महाराष्ट्रात नांदेड येथील एका कुटुंबानं आपला आनंद वाटून घेण्यासाठी असं काही केलं आहे, जे चर्चेचा विषय बनला आहे. इथं नांदेडच्या बहादूरपुरा गावात पेठकर कुटुंब राहतं. या कुटुंबाला वाटलं की, जर आनंद वाटून घ्यायचाच असेल, तर अशी एखादी गोष्ट दिली पाहिजे, जी कुटुंबाला कठीण काळात आधार देऊ शकेल. आपल्या घरी झालेल्या लग्नाच्या निमित्ताने, या कुटुंबाने गावातल्या सुमारे साडेतीन हजार लोकांसाठी अपघात विम्याची व्यवस्था केली. प्रत्येक व्यक्तीला एक लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले. या उपक्रमामागची भावना खूप हृदयस्पर्शी आहे. अपघातानंतर कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो, हे या कुटुंबाने पाहिले होते. अशा वेळी एक छोटीशी मदतही मोठा आधार ठरू शकते,'' असे नरेंद्र मोदींनी सांगितले. ''सरकार देशभरातल्या कोट्यवधी कुटुंबांना सुरक्षा कवच पुरवत आहे. 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजने'अंतर्गत केवळ २० रुपयांच्या वार्षिक हप्त्यात म्हणजेच एका वर्षाच्या फक्त २० रुपयांच्या हप्त्यात २ लाख रुपयांपर्यंतचा अपघात विमा मिळतो. आतापर्यंत ५८ कोटींहून अधिक लोक या योजनेत सामील झाले आहेत. यापैकी अंदाजे २८ कोटी आपल्या माता, भगिनी, मुली आणि महिला आहेत. आतापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार, या योजनेअंतर्गत पीडित कुटुंबांना ३,७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत मिळाली आहे. अशाच प्रकारे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनाही तितकीच महत्त्वाची आहे. ही योजना एखाद्या व्यक्तीच्या दुर्दैवी मृत्यूनंतर त्या कुटुंबाला २ लाख रुपयांचे विमा संरक्षण प्रदान करते. याचा वार्षिक हप्ता फक्त ४३६ रुपये आहे म्हणजेच दिवसाला जेमतेम दीड रुपया. या योजनेत आतापर्यंत २७ कोटींहून अधिक लोक सामील झाले आहेत. या योजनेअंतर्गत देशभरातील सुमारे ११ लाख कुटुंबांना सुमारे २२ हजार कोटी रुपयांची मदत मिळाली आहे,'' असं नरेंद्र मोदींनी सांगितलं.

''अनेक लोकांनी मला पत्र लिहून एका खास विषयावर बोलण्याची सूचना केली आहे. हा विषय 'गणेशोत्सवा'शी संबंधित आहे. 'गणेशोत्सवा'ला अजून बराच वेळ बाकी आहे, पण या विषयावर आताच बोललं पाहिजे, असा लोकांचा आग्रह आहे. खरंतर, गणपतीच्या मूर्ती बनवण्याचं काम खूप आधीपासूनच सुरू होतं. मूर्ती बनवणारे, मूर्तींच्या व्यापाराशी जोडले गेलेले लोक आतापासूनच कामाला लागतात. म्हणूनच माझा तुम्हा सर्वांना एक आग्रह आहे. तुम्ही असा प्रयत्न करा की तुमच्या घरी, सोसायटीत किंवा आजूबाजूच्या ठिकाणी गणपती बाप्पाच्या ज्या मूर्तीची प्रतिष्ठापना होईल, ती आपल्या देशाच्या मातीपासून बनलेली असावी, ती आपल्या कुंभारांच्या आणि स्थानिक कलाकारांच्या हातांनी तयार झालेली असावी. जे लोक गणपतीच्या मूर्ती बनवतात, त्यांनाही माझी विनंती आहे की त्यांनी मातीच्या मूर्तींना प्राधान्य द्यावं. आणि जे लोक मूर्ती खरेदी करतात, त्यांनीही गणपती बाप्पाची मूर्ती कशापासून बनली आहे आणि ती कोणत्या देशात तयार झाली आहे, हे नक्की पहावं. 'प्लास्टर ऑफ पॅरिस'पासून बनलेल्या मूर्ती अजिबात खरेदी करणं पूर्णपणे टाळा,'' असं नरेंद्र मोदी म्हणाले.

पुढं नरेंद्र मोदी यांनी सांगितलं की, ''मातीच्या मूर्ती पूजेनंतर सहजपणे पाण्यात विरघळून जातात. यामुळं आपल्या नद्या, तलाव आणि पर्यावरणाचं रक्षण होतं. आपली श्रद्धाही टिकून राहते आणि निसर्गाप्रती असलेले आपले कर्तव्यही पूर्ण होते. आपण स्थानिक कारागिरांकडून मूर्ती विकत घेतो, तेव्हा आपण 'व्होकल फॉर लोकल'चा संकल्प अधिक बळकट करतो. यावेळच्या 'गणेशोत्सवात' आणि अशा प्रत्येक उत्सवात आपण या सगळ्या गोष्टींचा नक्कीच गांभीर्याने विचार करू आणि देशाच्या हिताची पावलेही उचलू, याची मला खात्री आहे.'' याचबरोबर, नरेंद्र मोदी म्हणाले, ''आपण पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवलाच पाहिजे. 'पावसाचे पाणी साठवा' मोहिमेची गती आपण किंचितही मंदावू देता कामा नये. त्यामुळं, मी तुम्हा सर्वांना एक विशेष विनंती करतो. चला, आपण सर्व एकत्र येऊया आणि पावसाचा प्रत्येक थेंब वाचवूया.''